थेट पवारांची बनवट सही केली, शिक्का मारुन पत्र नियोजन कार्यालयात धाडलं, बीडच्या प्रशासकीय वतुर्ळात खळबळ >> पान 2

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या सार्ध शताब्दी वर्षानिमित्त केवडिया (गुजरात) येथे महाराष्ट्राचा चित्ररथ >> पान 3

बुलढाण्याचा अभिमान वैभव भुतेकर! >> पान 4

**सुविचार**

मनातील नकारात्मकता दूर करा.



# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 88 ■ शुक्रवार, दि. 31 ऑक्टोबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

५२ वर्षांच्या महिमा चौधरीनं, ६२ वर्षांच्या संजय मिश्रांसोबत बांधली लग्नगाठ? आतील पान

## होऊ दे खर्च! निवडणूक आयोगानं वाढवला निवडणुकीतील खर्चाचा 'कोटा'!

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य निवडणूक आयोगाने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी उमेदवारांच्या निवडणूक खर्च मर्यादेत मोठी वाढ केली आहे. आधीच्या तुलनेत सुमारे दीडपट वाढ केल्याने उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे. आयोगाच्या या निर्णयामुळे निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना प्रत्यक्ष निवडणूक प्रचारासाठी अधिक आर्थिक मोकळीक मिळणार आहे. यापूर्वी जिल्हा परिषद निवडणुकांसाठी उमेदवारांसाठी सहा लाख रुपयांची आणि महापालिका निवडणुकांसाठी दहा लाख रुपयांची खर्च मर्यादा होती. मात्र, बदलत्या काळानुसार आणि वाढत्या खर्चाच्या पार्श्वभूमीवर ही मर्यादा आता वाढवण्यात आली आहे. महागाई, प्रचार साधनांचे दर, डिजिटल माध्यमांवरील खर्च आणि वाहनभाडे यांसारख्या बाबींचा विचार करून आयोगाने हा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले आहे.

महापालिका निवडणुकांमध्ये पूर्वी सदस्यसंख्येच्या आधारे खर्च मर्यादा ठरवली जात होती. आता मात्र आयोगाने ती महापालिकांच्या वर्गवारीनुसार निश्चित केली आहे. या नव्या निर्णयानुसार महापालिका नगरसेवकांसाठी पुढीलप्रमाणे खर्च मर्यादा लागू राहील.



मुंबई, पुणे आणि नागपूर महापालिका: १५ लाख

पिंपरी चिंचवड, नाशिक आणि ठाणे महापालिका: १३ लाख

कल्याण-डोंबिवली, छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई, वसई-विरार: ११ लाख

'ड' वर्गातील १९ महापालिका: ९ लाख

तसेच, नगरपरिषद आणि नगरपंचायतींसाठीही नव्या खर्च मर्यादा निश्चित करण्यात आल्या आहेत.

'अ' वर्ग नगरपरिषद: नगरसेवक ५ लाख, थेट नगराध्यक्ष १५ लाख

'ब' वर्ग नगरपरिषद: नगरसेवक ३.५ लाख, नगराध्यक्ष ११.२५ लाख

'क' वर्ग नगरपरिषद: नगरसेवक २.५ लाख, नगराध्यक्ष ७.५ लाख

नगरपंचायत: नगरसेवक २.२५ लाख, नगराध्यक्ष ६ लाख

या वाढीमुळे उमेदवारांना कायदेशीर चौकटीत राहून प्रभावी प्रचार करण्यास मदत होईल. तसेच निवडणुकीचा खर्च पारदर्शक, नियमनबद्ध आणि वास्तवाशी सुसंगत राहील, अशी चिन्हे आहेत. ही सुधारित खर्च मर्यादा आगामी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी लागू होणार आहे.

निवडणुकीत टोकाचीं ईर्ष्या होणार!

दुसरीकडे, राज्यात गेल्या पाच वर्षांपासून कोणत्याही प्रकारे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या नसल्याने मोठी चुरस निर्माण झाली आहे. महायुतीसह महाविकास आघाडीकडूनही अनेकांनी गेल्या चार महिन्यांपासून निवडणुकांची चाहुल लागताच तयारी सुरु केली आहे. यंदाचे गणेशोत्सवातही अनेक इच्छुकांनी गणेश मंडळांना हात सैल केला होता. त्यामुळे निवडणुकीतील चुरस पाहता कागदोपत्री खर्च सोडून मोठा खर्च होणार हे नव्याने सांगण्याची गरज नाही.

## सातारा महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणात रणजीतसिंह निंबाळकर पहिल्यांदाच बोलले

**दैनिक आपला विदर्भ**

**सातारा/प्रतिनिधी :** सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टरने गळफास लावून आत्महत्या केली. हे प्रकरण महाराष्ट्रात चर्चेचा विषय आहे. या प्रकरणात महिला डॉक्टरने हातावर सुसाईड नोट लिहीली आहे. यामध्ये आरोपी इएघब गोपाळ बदने आणि प्रशांत बनकरच्या नावाचा उल्लेख आहे. यासोबतच या प्रकरणात माजी खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांच्यावर अनेक आरोप होत आहेत. यानंतर निंबाळकरांनी माध्यमांशी बोलणे टाळले होते मात्र त्यांचा एक व्हिडिओ समोर आला आहे ज्यामध्ये ते कार्यकर्त्यांना शांत राहण्याचे आवाहन केलं आहे.

टीका करणाऱ्यांना संविधानिक भाषेतून उत्तर देऊ,आरोपांचे समाधान करू,समाधान झाले नाही तर कायदेशीर उत्तर देऊ त्यामुळे माझ्यावर आरोप करणाऱ्यांवर टीका करू नये अशी विनंती त्यांनी कार्यकर्त्यांना केली आहे. आपली संस्कृती आपल्याला टिकवायची आहे आंपल्याला बदला घ्यायचा नाही तर बदलाव करायचा आहे असं देखील रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी सांगितला आहे.

## बीडमध्ये मनी हाईस्ट, भिंत फोडून कॅनरा बँकेवर दरोडा, गॅस कटरने बँकेची तिजोरी फोडली

**बीड/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यात गुन्हेगारीच्या घटना थांबण्याचं नाव घेत नाहीत. नुकत्याच पंधरा लाखांच्या दरोड्याच्या घटनेचा तपास अद्याप सुरू असतानाच, आता बीडजवळील पाली गावातील कॅनरा बँकेवर दरोडा पडला आहे. या घटनेमुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी मध्यरात्री चोरट्यांनी बँकेच्या पाठीमागील भिंतीला छेद करून आत प्रवेश केला. अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने हा दरोडा टाकण्यात आला आहे. या दरोड्यामुळे ठेवीदारांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

चोरट्यांनी गॅस कटरच्या सहाय्याने बँकेची तिजोरी फोडली आणि त्यातील लाखो रुपयांचा ऐवज आणि रोख रक्कम लंपास केली. प्राथमिक अंदाजानुसार, चोरी गेलेल्या रकमेत मोठी रक्कम असल्याचं सांगितलं जात आहे, मात्र नेमकी आकडेवारी अद्याप अधिकृतपणे स्पष्ट झालेली नाही. सकाळी नेहमीप्रमाणे कर्मचारी बँकेत आल्यावर हा प्रकार त्यांच्या लक्षात आला. बँकेच्या आत पसारा आणि तिजोरी फोडलेली पाहून त्यांनी तातडीने वरिष्ठ अधिकारी आणि पोलिसांना कळवले. या दरोड्यानंतर स्थानिकांमध्ये आणि ग्राहकांमध्ये मोठी भीती आणि संतापाचे वातावरण आहे.दरम्यान, पाली गावातील या बँक दरोड्यामुळे बीड पोलिसांपुढे मोठं आव्हान उभं राहिलं आहे. अगदी काही दिवसांपूर्वीच बीड शहरात पंधरा लाखांच्या दरोड्याची घटना घडली होती, आणि आता पुन्हा अशाच प्रकारचा बँक दरोडा घडल्याने जिल्हा पोलिसांची सुरक्षा व्यवस्था धोक्यात आली असल्याचं स्पष्ट होत आहे. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज, परिसरातील हालचाली आणि संशयित वाहनांची तपासणी सुरू केली आहे.

# बच्चू कडूंच्या आंदोलनाला यश!

## शेतकरी कर्जमुक्तीचा निर्णय ३० जूनपूर्वी घेणार, उच्चाधिकारी समिती स्थापन : मुख्यमंत्री फडणवीस

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांच्या आक्रमक आंदोलनानंतर अखेर राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीच्या दिशेने मोठे पाऊल टाकले आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी शासनाने उच्चाधिकार समितीची स्थापना केली आहे. या ९ सदस्यीय समितीच्या अध्यक्षपदी मुख्यमंत्र्यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

स्थापन करण्यात आलेल्या या समितीला येत्या सहा महिन्यांच्या आत राज्य सरकारला अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शेतकरी कर्जमुक्तीसाठी आवश्यक असणाऱ्या अल्पकालीन व दीर्घकालीन शिफारशी सुचवण्याचे काम ही समिती करणार आहे. या ९ सदस्यीय उच्चाधिकार समितीत विविध महत्त्वाच्या विभागांतील आणि बँकिंग क्षेत्रातील प्रतिनिधींचा समावेश आहे. यात महसूल, वित्त, कृषी, सहकार आणि पणन या विभागांचे अप्पर मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित, मुंबईचे अध्यक्ष तसेच बँक ऑफ महाराष्ट्रचे प्रतिनिधी यांचा समावेश आहे. समितीच्या या शिफारशींवर राज्य सरकार कर्जमाफीच्या पुढील धोरणात्मक निर्णय घेणार आहे.



कर्जमाफीचे निकष काय असतील तसेच शेतकरी थकीत कर्जात जाणार नाही याचा निर्णय समिती करणार आहे. त्यानुसार एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात समितीने त्यांचा अहवाल सादर करावा. ३० जून २०२६ पूर्वी कर्जमाफीचा निर्णय घेण्याचे आम्ही ठरवले आहे. बैठकीत जी चर्चा झाली ती सकारात्मक झाली आहे. तसेच आम्ही आमचे आश्वासन पाळू असे सांगितले होते. शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे दिले पाहिजे याची तरतूद आम्ही केली आहे. जवळपास आज आम्ही आज अंदाज घेतला तर साडे आठ कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात गेले आहेत. त्यामुळे आत्ता शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जाणं हे महत्त्वाचे आहे.

## धर्मादाय आयुक्तांकडून ४ तारखेचा व्यवहार रद्द; अखेर गोखले बिल्डर्सकडून जैन बोर्डिंग ट्रस्टला मिळाली


**पुणे/प्रतिनिधी :** शहरातील कोथरुड येथील जैन बोर्डिंग जमीन व्यवहार प्रकरणात जैन ट्रस्ट आणि गोखले बिल्डर यांच्यात झालेला जमीन व्यवहार अखेर रद्द करण्यात आला आहे. काही दिवसांपूर्वी जमीन गैरव्यवहारप्रकरणावरुन मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर गंभीर आरोप करणअयात आल्यानंतर गोखले बिल्डर्सकडून हा जमीन व्यवहार रद्द करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले होते. त्यानुसार, गोखले बिल्डर्सने माघार घेताच आता, धर्मादाय आयुक्त यांनी जमीन व्यवहार रद्द करण्याचे आदेश दिले आहेत. गोखले बिल्डर्स आणि जैन बोर्डिंग ट्रस्ट यांच्यात कोथरुड येथील जागेसंदर्भात मोठा आर्थिक व्यवहार झाला होता. शिवसेना नेते तथा माजी आमदार रविंद्र धंगेकर यांनी याप्रकरणी केंद्रीयमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर गंभीर आरोप केले होते. तब्बल ३००० कोटींच्या घरात हा व्यवहार असून मोठा भ्रष्टाचार व जैन बोर्डिंगची जमीन लाटण्याचा प्रयत्न होत असल्याचे धंगेकर यांनी म्हटले होते. त्यानंतर, वरिष्ठ पातळीवर दबाव येताच, मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी या व्यवहारातून आपले हात काढून घेतले. तर, गोखले बिल्डर्सनेही हा व्यवहार रद्द करत असल्याचे सांगितले होते. त्यानुसार आता कायदेशीर मार्गाने हा व्यवहार रद्द झाला आहे. धर्मादाय कार्यालयाकडून थोड्याच वेळात अधिकृत निकालाची प्रत प्राप्त होणार आहे.

## राज्यात १०० टक्के पीक पाहणीसाठी पुन्हा मुदतवाढ

### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंचे सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आदेश

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात १०० टक्के पीक पाहणीसाठी पुन्हा मुदतवाढ देण्यात आली आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना या संदर्भातील आदेश दिले आहेत. ई पीक पाहणीसाठी ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. दरम्यान, ऑक्टोबर महिन्यामध्ये करण्यात आलेल्या ई पाहणीमध्ये ३६ टक्के पिकांची नोंद करण्यात आली. पीक नोंदणी न झाल्यास नैसर्गिक आपत्ती, पिक विमा, पीक कर्ज



या लाभांपासून शेतकरी वंचित राहू नये, यासाठी ई पिक पाहणी महत्त्वाची आहे. या पार्श्वभूमीवर १०० टक्के पीक पाहणीसाठी पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात आली आहे.

**अशी करा ई-पीक नोंदणी**

पद्वारे लॉगिन केल्यावर शेतकऱ्यांनी त्यांच्या नावावर असलेल्या जमिनीचा गट क्रमांक निवडावा. पिकांची माहिती जसे की पीक क्षेत्र, पेरणीची तारीख आदी काळजीपूर्वक भरावी. ॲपमध्ये आता ५० मीटरच्या आतून पिकांचा फोटो काढणे बंधनकारक आहे, जेणेकरून पिकाची अचूक माहिती मिळेल. एकदा माहिती जतन (सेव्ह) केल्यावर, ती आपोआप सातबारावर नोंदवली जाते. यामुळे शेतातील पिकांची नोंदणी अधिकृतपणे होते.

## कुणाला कर्जमाफी द्यायची कुणाला नाही? बच्चू कडूंनी सांगितला सातबारा कोरा करण्याचा फॉर्म्युला

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या शेतकरी आंदोलनावर आज तोडगा निघण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करून सातबारा कोरा करण्याच्या मागणीसाठी मागील काही दिवसांपासून नागपूरमध्ये मोठं आंदोलन सुरू आहे. मात्र, बच्चू कडू यांनी अखेर राज्य सरकारशी चर्चा करण्यास होकार दर्शविल्याने समाधानाचा किरण दिसू लागला आहे.

बच्चू कडू आज मुंबईकडे रवाना झाले असून, संध्याकाळी ७ वाजता सह्याद्री अतिथिगृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत महत्त्वाची बैठक होणार आहे. या बैठकीत शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर तोडगा निघण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सरकारकडून सकारात्मक निर्णय झाल्यास नागपूरमधील आंदोलन थांबू शकतं, अशी चर्चा राज्यभर पसरली आहे.

मुंबईला रवाना होताना बच्चू कडू यांनी स्पष्ट भूमिका मांडली. ते म्हणाले, ''कर्जमाफी ही फक्त खऱ्या अर्थाने अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांसाठीच असावी. जे आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत, सरकारी नोकरीत आहेत, पेन्शन घेतात, व्यापारी आहेत किंवा ज्यांनी फक्त गुंतवणुकीसाठी शेती घेतली आहे.त्यांना कर्जमाफी मिळू नये.'' ते पुढे म्हणाले, ''आज डिजिटल युगात सरकारला प्रत्येकाची खरी आर्थिक स्थिती तपासणे सोपे झाले आहे. त्यामुळे सरकारने गरजवंत शेतकऱ्यांना ओळखून त्यांना त्वरित मदत द्यावी. खऱ्या शेतकऱ्याला दिलासा मिळालाच पाहिजे.'' दरम्यान, मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनीही बच्चू कडू यांची भेट घेतली आहे आणि शेतकऱ्यांच्या लढ्याला पाठिंबा जाहीर केला आहे. त्यांनी सरकारवर गंभीर आरोप करताना म्हटलं, ''मी शेतकऱ्याचा मुलगा म्हणून या आंदोलनात आलो आहे. पण सरकारने आंदोलन कमकुवत करण्यासाठी डाव टाकला आहे. त्यांच्या षडयंत्राला आता उत्तर द्यावं लागेल.''

जरांगे पुढे म्हणाले, ''नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरकारने अतिशय कमी मदत केली आहे. आम्ही १०० टक्के भरपाईची मागणी करतो. सरकारने आत्ताच योग्य पाऊल उचललं पाहिजे. सगळे शेतकरी एकत्र आले तर कुणीही आपल्याला थांबवू शकणार नाही.''

दरम्यान, आजच्या बैठकीत या मुद्द्यांवर चर्चा होणार असून, राज्यभरातील शेतकरी या बैठकीकडे आशेने पाहत आहेत.

## मतदारयादीच्या घोळावरून विरोधकांकडून 'मोर्चे'बांधणी, निवडणूक आयोग ॲक्शन मोडवर, घेतला मोठा निर्णय

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मतदारयादीच्या घोळावरून राज्यातील विरोधी पक्ष चांगलाच आक्रमक झाला आहे. मतदार यादीतील घोळ, बोगस मतदारांविरोधात राज्यातील विरोधी पक्षांनी येत्या एक नोव्हेंबर रोजी मोर्चाची हाक दिली आहे. तर, दुसरीकडे आता राज्य निवडणूक आयोग ॲक्शन मोडवर आले आहे. राज्य निवडणूक आयोगाने महत्त्वाचे निर्देश जारी केले आहेत.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांमध्ये पारदर्शकता, अचूकता आणि विश्वासार्हता टिकवण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने बुधवारी, सर्व जिल्हा प्रशासन, निवडणूक अधिकारी आणि संबंधित स्थानिक संस्थांना महत्त्वाचे निर्देश जारी केले. आयोगाने मतदार याद्यांमधील संभाव्य दुबार नावे ओळखून त्यांची काटेकोर पडताळणी करण्याचे आदेश दिले आहेत.

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी भारत निवडणूक आयोगाने तयार केलेली विधानसभा मतदार यादीच वापरली जाते. मात्र, ही यादी स्थानिक स्तरावर प्रभाग, पंचायत समिती गण आणि जिल्हा परिषद निवडणूक विभागांप्रमाणे विभागली जाते. विभाजन करताना मतदारांची नावे, पत्ते आणि क्रमांक हे मूळ यादीप्रमाणेच कायम ठेवले जातात.

दुबार मतदारांच्या नावासमोर विशेष चिन्ह...

आयोगाने स्पष्ट केले आहे की, मतदार यादीतील संभाव्य दुबार नावांसमोर (ङङ) हे विशेष चिन्ह दाखवले जाईल. अशा मतदारांची स्थानिक स्तरावर तपासणी करून ती एकाच व्यक्तीची आहेत की वेगवेगळ्या व्यक्तींची, याची खात्री करणे आवश्यक आहे. तपासणीदरम्यान मतदाराचे नाव, लिंग, पत्ता आणि छायाचित्र यांतील साम्य तपासले जाणार आहे.

जर मतदाराचे नाव दोन ठिकाणी आढळले, तर त्याने तो नेमक्या कोणत्या प्रभागातील मतदान केंद्रावर मतदान करणार आहे याबाबत अधिकृत अर्ज भरावा लागेल. त्यानंतर त्याला फक्त त्या एकाच केंद्रावर मतदानाची परवानगी असेल. याशिवाय, संभाव्य दुबार नाव असलेल्या मतदाराकडून प्रतिसाद न मिळाल्यास, तो मतदानासाठी आल्यास त्याच्याकडून इतर कोणत्याही केंद्रावर मतदान केलेले नाही आणि करणार नाही याबाबत हमीपत्र घेतले जाईल. त्याची ओळख पटल्याशिवाय मतदानाची मुभा दिली जाणार नाही, असा आयोगाचा स्पष्ट आदेश आहे.

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या या निर्देशांमुळे आगामी महानगरपालिका, नगरपरिषदा, ग्रामपंचायती आणि जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये मतदार यादीतील त्रुटी टाळण्यास आणि निवडणुकीची पारदर्शकता वाढविण्यास मदत होणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

>> पान २

## लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल

आज ३१ ऑक्टोबर, भारताचे पहिले उपपंतप्रधान, पहिले गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची आज १५० वी जयंती. सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी आणंद या छोट्याशा गावात झाला. त्यांचे वडील झव्हेरिभाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता. त्यामुळे लहानपणीच त्यांना देशभक्तीचे बाळकडू मिळाले. त्यांच्या संपुर्ण कुटुंबावर स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव होता. सरदार पटेल हे हुशार विद्यार्थी होते. त्यांनी वकिलीचे शिक्षण पूर्ण करून बोरसाड येथे वकिली सुरू केली. एक अभ्यासू वकील म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले पुढे ते बॅरिस्टर झाले. बॅरिस्टर झाल्यावर अहमदाबाद येथे त्यांनी वकिली सुरू केली. अल्पावधीतच एक निष्णात वकील म्हणून त्यांची कीर्ती देशभर पसरली. वकिलीसोबत त्यांना राजकारणाचीही आवड होती त्यामुळे त्यांनी अहमदाबाद पालिकेची निवडणूक लढवली त्यांनी ती निवडणूक सहज जिंकली. राजकारणात आल्यावर त्यांना जनतेचे मूलभूत प्रश्न समजू लागले. १९१७ साली खेडा जिल्ह्यात प्रचंड पाऊस झाला त्यामुळे खरिपाचे पीक वाया गेले. पुढे उंदराचा सुळसुळाट आणि किटकांमुळे रब्बीचे पीकही गेले त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले. त्यातच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या हाती २५ टक्क्यांपेक्षाही कमी उत्पादन येईल अशी परिस्थिती निर्माण झाली. नैसर्गिक आपत्तीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना शेतसाऱ्यात सूट मिळावी, शेतसाऱ्याची वसुली पुढे ढकलावी यासाठी त्यांनी १८ हजार शेतकऱ्यांच्या सह्या असलेले निवेदन सरकारकडे दिले पण सरकारने त्याची दखल न घेता शेतसारा वसुलीसाठी शेतकऱ्यांवर जप्तीचे आदेश दिले त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. महात्मा गांधी यांनी सक्तीच्या शेतसारा वसुली विरोधात खेडा येथे सत्याग्रह चळवळ सुरू केली. या चळवळीचे नेतृत्व त्यांनी सरदार पटेल यांच्याकडे सोपवले. शेतकऱ्यांचे हे आंदोलन त्यांनी अत्यंत निर्धाराने यशस्वी केले. या आंदोलनात त्यांनी केलेल्या नेतृत्वाने महात्मा गांधी भारावून गेले. पुढे महात्मा गांधी यांच्या प्रत्येक चळवळीत त्यांनी हिरीरीने भाग घेतला. नेतृत्वाप्रमाणेच त्यांचे वक्तृत्वही प्रभावी होते. आपल्या वक्तृत्वाने जनसामान्यांना प्रभावित करणाऱ्या सरदार पटेलांनी १९२८ साली सायमन कमिशन विरोधात पुकारलेल्या बारडोली सत्याग्रहादरम्यान लोकांना आपल्या महान विचारांनी प्रभावित केले त्यामुळे इंग्रजांनी अवाजवी वाढवलेल्या करांना न भरण्यावर जनता सहमत झाली त्यामुळे ब्रिटिश व्हाइसरॉयला पराभव पत्करावा लागला. या आंदोलनात आपल्या सशक्त नेतृत्वाने वल्लभभाई पटेल जनतेत चांगलेच प्रसिद्ध झाले आणि बारडोलीतील लोक त्यांना सरदार म्हणू लागले त्यामुळे त्यांच्या नावापुढे सरदार जोडले जाऊ लागले. १९३० साली सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला म्हणून त्यांना इंग्रजांनी अटक केली. त्यांना पाच वर्षांचा तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला त्यावेळीही त्यांना अटक झाली. १९४६ झाली स्थापन झालेल्या हंगामी सरकारमध्ये ते गृहमंत्री होते. गृहमंत्री या नात्याने त्यांनी भारत पाक फाळणीच्या चर्चेमध्ये निर्णायक भूमिका बजावली. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात ते उपपंतप्रधान बनले. त्यांच्याकडे गृहखाते, माहिती आणि नभोवाणी, संस्थांनचा प्रश्न व निर्वासितांचा प्रश्न व निर्वासितांचे प्रश्न सारखे महत्वाचे खाते देण्यात आले. स्वातंत्र्य भारताचे गृहमंत्री झाल्यावर सरदार पटेल यांनी सर्वात आधी भारतातील वेगवेगळ्या संस्थानातील राजांना आपल्या दूरदर्शीपणाचा आणि बुद्धिमत्तेचा वापर करून भारतात विलीन होण्याची सूचना केली. बहुतांश संस्थानांनी याला सहमती दर्शवून भारतात विलीन झाले पण जुनागड, हैदराबादचा निजाम, जम्मू काश्मीर च्या राजांनी भारतात विलीन होण्यास नकार दिला. सरदार पटेलांनी आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या बळावर सैन्याचा वापर करीत या तिन्ही संस्थानांना भारतात विलीन केले. सरदार पटेल यांनी तत्कालीन ५६५ संस्थाने भारतात विलीन करून एकसंध भारत निर्माण केला त्यांची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच होती. त्यांच्या याच कामगिरीने त्यांना लोहपुरुष ही पदवी देण्यात आली. १९५० साली त्यांचे स्वास्थ्य बिघडू लागले. २ नोव्हेंबर १९५० ला त्यांचे स्वास्थ्य इतके बिघडले की ते अंथरुणावरुन उठण्यास देखील असमर्थ होते. पुढे १५ डिसेंबर १९५० रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली. सरदार पटेल यांना जातीदिनी विनम्र अभिवादन!

# थेट पवारांची बनवट सही केली, शिक्का मारून पत्र नियोजन कार्यालयात धाडलं, बीडच्या प्रशासकीय वतुर्ळात खळबळ

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात वारंवार समोर येणाऱ्या या बनावट पत्र आणि ओळखपत्र फसवणुकीच्या घटनांमुळे प्रशासकीय यंत्रणेच्या सुरक्षेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित होत असताना बीड जिल्ह्यातील प्रशासकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडवणारी घटना समोर आली आहे. थेट राज्याचे उपमुख्यमंत्री आणि बीडचे पालकमंत्री अजित पवार यांच्या सहीचं बनावट पत्र जिल्हा नियोजन कार्यालयात सादर करण्यात आलं आहे. या प्रकारानंतर एका व्यक्तीविरोधात बीडमधील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाय. माजलगाव तालुक्यातील लहामेवाडी येथील अशोक वाघमारे असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. (ाँब ीग्स ै)

नेमका प्रकार काय?

मिळालेल्या माहितीनुसार, अशोक वाघमारे या व्यक्तीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाचा गैरवापर करत त्यांची बनावट सही आणि शिक्का वापरून एक पत्र तयार केलं. हे पत्र थेट जिल्हा नियोजन कार्यालय बीड येथे सादर करण्यात आलं. मात्र अधिकाऱ्यांच्या लक्षात संशयास्पद बाबी आल्यानंतर त्यांनी त्या पत्राची चौकशी केली असता सही बनावट असल्याचं स्पष्ट झालं. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाने तातडीने पोलिसांशी संपर्क साधत वाघमारेविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. या प्रकरणाने प्रशासकीय यंत्रणेतील गोपनीयता आणि सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निमाण केले आहेत. उच्चपदस्थ नेत्यांच्या नावाने अशा प्रकारे बनावट पत्र सादर केल्याने प्रशासकीय कामकाजातील विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

यापूर्वीही अशाच स्वरूपाचा प्रकार बीड जिल्ह्यात घडला होता. जुलै २०२५ मध्ये भाजप आमदार प्रसाद लाड यांच्या नावाने बनावट लेटरहेड आणि सही वापरून तब्बल तीन कोटी वीस लाख रुपयांचा निधी वर्ग करण्यात आल्याचं प्रकरण उघड झालं होतं. आता थेट उपमुख्यमंत्र्यांच्या नावाचा वापर करून फसवणूक करण्याचा प्रकार समोर आल्यानं प्रशासनात खळबळ उडाली आहे.

केंद्रीय मंत्र्याचा पीए असल्याचा बनाव अनब..

दरम्यान, अशाच स्वरूपाचा दुसरा बनावटगिरीचा प्रकार मुंबईतही उघडकीस आला आहे. केंद्रीय मंत्र्यांचा पीए असल्याचा बनाव करून मुंबई पोलीस आयुक्तांच्या जनता दरबारात शिरकाव करण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोन व्यक्तींना पोलिसांनी अटक केली आहे. धीरेंद्रकुमार व्यास आणि भरत मन अशी या दोघांची नावे आहेत. पोलीस आयुक्तालयात प्रवेश करताना धीरेंद्रकुमार व्यास याने स्वत:ला केंद्रीय मंत्र्यांचा पीए असल्याचा दावा केला होता. मात्र पोलिसांना संशय आल्याने चौकशी करण्यात आली असता हा बनाव उघड झाला. या दोघांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# परभणी जिल्ह्यात जोरदार पाऊस, रब्बी पेरण्यांचाही खोळंबा; वेचणीसाठी आलेला कापूस भिजल्याने मातीमोल

**परभणी/प्रतिनिधी :** जिल्ह्यात आज गुरुवारी (दि.३०) सकाळपासूनच पावसाला सुरुवात झाली असून वेचणीसाठी आलेल्या कापसाचीही या पावसाने माती केली आहे. कालपासूनच आकाश ढगाळ होते मात्र आज सकाळीच पावसाने बरसायला प्रारंभ केला. हा पाऊस जिल्ह्यात सर्वदूर असून अतिवृष्टीतून ज्या ठिकाणचे कापसाचे क्षेत्र वाचले त्या ठिकाणी वेचणीला आलेला कापूस आता या पावसाच्या तडाख्यात सापडला आहे. दुसरीकडे रब्बीच्या पेरण्यांचा खोळंबाही या पावसाने केला आहे.

काल बुधवारी ढगाळ वातावरण होते. काही ठिकाणी पावसाच्या सरीही कोसळल्या. आज मात्र सकाळपासूनच पावसाने हजेरी लावली. जिल्ह्याच्या अनेक भागात सध्या कापूस फुटलेला आहे. दिवाळीच्या काळात वेचणीसाठी मजूर न मिळाल्याने हा कापूस तसाच राहिला होता. आज झालेल्या पावसाने शेतातला वेचणीसाठी आलेला कापूस भिजला असून हा कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी मोठा फटका आहे. एकाच वेळी कापूस सर्वत्र फुटल्याने वेचणीसाठी मजूर महिला मिळत नाहीत, नेमक्या याच काळात पावसाने जोरदार हजेरी लावल्याने शेतकऱ्यांच्या हाती येणारा उरला सुरला कापूसही आता हातातून गेला आहे.

अतिवृष्टीच्या फटक्याने आधीच सोयाबीनने शेतकऱ्यांची निराशा केली आहे. चार हजार रुपयांचा दर सोयाबीनला असून पावसामुळे उत्पादनाचा दर्जाही निकृष्ट झाला आहे. अतिवृष्टीचे संकट येऊन गेल्यानंतर जो काही कापूस उरलेला आहे त्याची आता वेचणी करता येईल आणि हाती लागलेल्या कापसाची काहीतरी मदत होईल अशी अपेक्षा असणाऱ्या शेतकऱ्यांना सध्या सुरू झालेल्या पावसाने आणखीच काळजीत टाकले आहे. दिवाळी संपल्याबरोबर शेतकऱ्यांनी रब्बी हंगामातील ज्वारी, हरभरा या पिकांच्या पेरणीला प्रारंभ केला पण गेल्या तीन-चार दिवसांपासून पडत असलेल्या अवकाळी पावसामुळे रब्बीच्या पेरणीवरही परिणाम झाला आहे. या पावसामुळे रब्बीच्या पेरण्या खोळंबल्या असून शेतकऱ्यांचे खरीपापाठोपाठ रब्बीचेही नियोजन विस्कळीत झाले आहे.

जिल्ह्यात सर्वच तालुक्यांमधील झालेल्या पावसाने वार्षिक सरासरी ओलांडली असून कुठे वार्षिक सरासरीच्या दीडपट पाऊस झाला आहे. पाऊस पिच्छा सोडत नसल्याने शेतात जाणेच अवघड होऊन बसले आहे. जिल्ह्यातल्या बहुतांश भागात शेत रस्त्यांचा प्रश्न असल्याने अशा पावसात मशागतीची कामे करणे शेतकऱ्यांना दुरापास्त झाले आहे.

## शासकीय रुग्णालयातील मृत्यूदर कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना करा : हसन मुश्रीफ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील शासकीय रुग्णालयातील मृत्यूदर कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, असे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले. सेंट जॉर्ज रुग्णालयात मृत्यूदर वाढीची वैद्यकीय शिक्षण मंत्री मुश्रीफ यांनी गांभीर्याने दखल घेऊन याविषयी तातडीच्या बैठकीचे आयोजन केले. यावेळी वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, संचालक डॉ. अजय चंदनवाले, जे.जे. रुग्णालय आणि सेंट जॉर्ज रुग्णालयाचे अधिष्ठाता आणि वैद्यकीय अधीक्षक आदींसह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले की, शासकीय रुग्णालयातील मृत्यूदर कमी करण्यासाठी रुग्णालयात वैद्यकीय सेवेत तत्काळ सुधारणा घडवून आणण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, निधी आणि उपकरणांची उपलब्धता प्राधान्याने सुनिश्चित करावी. अतीदक्षता विभागातील खाटांची संख्या, मनुष्यबळ वाढविणे, औषधे व आधुनिक उपकरणे पुरविणे आणि दीर्घकालीन सुधारणा आराखडा तयार करण्याचेही त्यांनी निर्देश दिले. अनेक रुग्ण खासगी रुग्णालयातून शेवटच्या टप्प्यात शासकीय रुग्णालयात स्थलांतरित होत असल्यानेही आयसीयूतील मृत्यूदर तुलनेने अधिक दिसत असल्याचे स्पष्ट करण्यात आले असल्याचे मुश्रीफ यांनी सांगितले.

२०२२ ते २०२५ दरम्यान एकूण मृत्यूदरात सातत्याने घट होत आहे. २०२२ मध्ये २०४० रुग्ण तर २०२५ मध्ये ७४०७ रुग्ण यशस्वीरीत्या उपचारानंतर घरी परतले.

यासंदर्भात वैद्यकीय शिक्षण विभागाने तातडीने कार्यवाही करत पारदर्शक चौकशी आणि मजबुत सुधारणा आराखडा आखला आहे. रुग्णालयातील सेवांची गुणवत्ता वाढण्यासाठी ठोस उपाययोजना अमलात आणण्यात येत आहेत.

# सरदार वल्लभभाई पटेल यांची १५० वी जयंती 'राष्ट्रीय एकता दिवस' विशेष स्वरूपात साजरा होणार !

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ३१ ऑक्टोबर राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जातो. या वर्षी त्यांच्या १५० व्या जयंतीच्या निमित्ताने हा दिवस भव्य स्वरूपात साजरा केला जाणार आहे. हा दिवस भारताच्या एकता, अखंडता आणि राष्ट्रीय एकजुटतेचे प्रतीक असून, ५६२ संस्थान एकत्रित येऊन आधुनिक भारताची पायाभरणी करणाऱ्या सरदार पटेलांच्या अद्वितीय कार्याला अभिवादन करणार आहे.

**एकतानगर येथे भव्य परेड आणि सांस्कृतिक कार्यक्रम**

या वर्षीचा उत्सव नैसर्गिक सौंदर्य आणि सांस्कृतिक समृद्धीचा संगम असणाऱ्या गुजरातमधील नर्मदा जिल्ह्यातील एकतानगर येथे आयोजित केला जाणार आहे. हे ठिकाण ''विविधतेत एकता'' या भारताच्या संकल्पनेचे प्रतीक म्हणून निवडले गेले आहे. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे केंद्रीय सशस्त्र पोलीस दल राज्य पोलीस दल आणि राष्ट्रीय कॅडेट कोर यांच्या सहभागाने भव्य परेड आणि सांस्कृतिक उत्सव आयोजित करण्यात आला आहे.

**राष्ट्रीय कॅडेट्स कोर आणि शालेय बँड यांचे सादरीकरण**

या परेडमध्ये सीमा सुरक्षा बल, केंद्रीय राखीव पोलीस दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल, भारत-तिबेट सीमा पोलीस, सशस्त्र सीमा बल तसेच आसाम, त्रिपुरा, ओडिशा, छत्तीसगड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, पंजाब, जम्मू आणि काश्मीर, केरळ आणि आंध्र प्रदेश या राज्यांच्या पोलीस दलांचा सहभाग असेल.



घोडदळ आणि उंटदळाचे संच, स्वदेशी जातींच्या श्वानांचे कौशल्य प्रदर्शन, मार्शल आर्ट सादरीकरणे आणि शस्त्रविरहित युद्धकौशल्याची प्रात्यक्षिके या परेडची शोभा वाढवतील.महिला सक्षमीकरणावर विशेष भर देत, प्रधानमंत्री यांना दिल्या जाणाऱ्या गार्ड ऑफ ऑनरचे नेतृत्व एक महिला अधिकारी करतील. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल आणि केंद्रीय राखीव बल च्या महिला कर्मचाऱ्यांकडून मार्शल आर्ट आणि युद्धकौशल्याचे प्रभावी प्रदर्शन सादर केले जाईल. याद्वारे त्यांचे शौर्य, शिस्त आणि आत्मविश्वास प्रकट होईल. राष्ट्रीय सुरक्षेत विशेष योगदान दिले आहे असे रामपूर हाउंड आणि मुधोल हाउंड हे स्वदेशी श्वान आपली कौशल्ये सादर करतील. विशेष म्हणजे, अखिल भारतीय पोलीस श्वान स्पर्धेत विजेती ठरलेली 'मुधोल हाउंड रिया' या वर्षीच्या परेडमध्ये डॉग स्क्वाडचे नेतृत्व करेल.

याशिवाय, गुजरात पोलिसांचे घोडदळ, आसाम पोलिसांचा मोटरसायकल डेअरडेव्हिल शो, सीमा सुरक्षा बल चे उंटदळ आणि उंट बँड, तसेच एनसीसी कॅडेट्स आणि शालेय बँड ''एकतेतच शक्ती आहे'' हा संदेश देत परेडमध्ये सहभाग घेतील. भारतीय वायुदलाच्या सूर्यकिरण पथकाकडून सादर होणारा भव्य एअर शो या परेडच्या भव्यतेत आणखी भर घालेल.

**विविधतेत एकता; संदेश देणारे संचलन**

राष्ट्रीय एकता दिनी परेडमध्ये विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश यांचे संचालन 'विविधतेत एकता' या विषयाचे दर्शन घडवतील. या संचालनात राष्ट्रीय सुरक्षा गार्ड, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, गुजरात, जम्मू आणि काश्मीर, अंदमान-निकोबार बेटे, मणिपूर, महाराष्ट्र, छत्तीसगड, उत्तराखंड आणि पुद्दुचेरी यांच्या संचालनाचा समावेश असेल.

यासह सीमा सुरक्षा बल, केंद्रीय राखीव पोलीस दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल, सशस्त्र सीमा बल, दिल्ली पोलीस आणि विविध राज्य पोलीस दलांचे ब्रास बँड कार्यक्रमाच्या उत्सवी वातावरणात अधिक रंग भरतील.

या परेडमध्ये केंद्रीय राखीव पोलीस दल चे पाच शौर्यचक्र विजेते आणि सीमा सुरक्षा बल चे १६ वीरता पदक विजेते सन्मानित केले जातील. या शूर जवानांनी नक्षलविरोधी आणि दहशतवादविरोधी मोहिमांमध्ये, तसेच पश्चिम सीमेवरील 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान, अद्वितीय धैर्य आणि पराक्रमाचे प्रदर्शन घडविले आहे.

परेडसोबतच भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाद्वारे आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात ९०० कलाकार भारतीय शास्त्रीय नृत्यांचे सादरीकरण करतील, ज्यातून भारताची समृद्ध सांस्कृतिक परंपरा आणि विविधतेतील सौंदर्य अधोरेखित होईल.

राष्ट्रीय एकता दिनाचे उद्दिष्ट नागरिकांमध्ये राष्ट्रीय एकता, सौहार्द आणि देशभक्तीची भावना दृढ करणे हे आहे. हा उत्सव प्रत्येक भारतीयाला या मूल्यांचा स्वीकार करण्यासाठी आणि देशाच्या ऐक्याच्या भावनेला बळ देण्यासाठी प्रेरित करतो. १ ते १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत एकतानगर येथे 'भारत पर्व' आयोजित करण्यात येईल. या पर्वात संपूर्ण भारतातील सांस्कृतिक सादरीकरणे आणि खाद्य महोत्सव आयोजित केला जाईल, ज्यामध्ये देशाच्या विविध परंपरांचा संगम पाहायला मिळेल. या पर्वाचा समारोप १५ नोव्हेंबर रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करून केला जाईल.

- वर्षा फडके-आंधळे
उपसंचालक (वृत्त)

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# सरदार वल्लभभाई पटेल यांच्या सार्ध शताब्दी वर्षानिमित्त केवडिया (गुजरात) येथे महाराष्ट्राचा चित्ररथ

## १ ते १५ नोव्हेंबर २०२५ दरम्यान केवडिया गुजरात येथे होणाऱ्या भारत पर्व महोत्सवात महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाचा सहभाग

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या सार्ध शताब्दी (१५० व्या) जयंती वर्षानिमित्त केंद्रीय गृह मंत्रालयामार्फत केवडिया, गुजरात येथे आयोजित करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय संचलन कार्यक्रमात यंदा प्रथमच महाराष्ट्र राज्याचा चित्ररथ सहभागी होणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे या वर्षी ''स्वराज्य: एकतेचा धागा'' या संकल्पनेवर हा चित्ररथ साकारण्यात आला आहे.

या चित्ररथात अग्रभागी छत्रपती शिवाजी महाराज सिंहासनावर विराजमान असल्याचे दर्शन घडते. त्यांच्या मागे वारकरी संप्रदायातील वारकरी यांची मूर्ती तर पार्श्वभूमीवर मराठा आरमारातील प्रसिद्ध गुराब नौका दर्शविण्यात आली आहे. या माध्यमातून राज्याच्या वैभवशाली इतिहासाची आणि एकतेची झलक दर्शविण्यात आली आहे.

या चित्ररथासोबत १४ कलाकारांचा चमू सांस्कृतिक सादरीकरण करणार असून, महाराष्ट्राच्या विविधतेतून एकतेचा संदेश देणारे हे सादरीकरण राष्ट्रीय स्तरावर राज्याची सांस्कृतिक ओळख अधोरेखित करेल.

तसेच, १ ते १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत भारत पर्व अंतर्गत महाराष्ट्र व गोवा राज्यांच्या सांस्कृतिक कार्य विभागांद्वारे संयुक्त सांस्कृतिक कार्यक्रम सादरीकरण करण्यात येणार आहे. या महोत्सवाचा मुख्य कार्यक्रम ७ -८ नोव्हेंबर २०२५ रोजी पार पडेल. महाराष्ट्र राज्याकडून या कार्यक्रमात राज्यातील समृद्ध लोकपरंपरेचे दर्शन घडविण्यासाठी गोंधळ



नृत्य, कोळी नृत्य, लावणी, तसेच वारी परंपरेवर आधारित सादरीकरणे यांचा समावेश असलेले सुमारे १५ ते २० कलाकारांचे पथक सहभागी होणार आहे.

या कार्यक्रमाची संकल्पना सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांची असून यासाठी सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांचे मार्गदर्शन आहे. या उपक्रमांद्वारे महाराष्ट्र राज्याचे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि लोकपरंपरेचे वैभव राष्ट्रीय तसेच आंतरराज्यीय पातळीवर प्रभावीपणे सादर होणार आहे.

## डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेअंतर्गत मदरसांना अनुदान; १४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील धर्मदाय आयुक्त अथवा महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत असलेल्या मदरसांना पायाभूत सुविधा, ग्रंथालय उभारणी आणि शिक्षकांच्या मानधनासाठी शासन स्तरावरून १० लाखांपर्यंतचे अनुदान उपलब्ध होणार आहे.

ही योजना शासन निर्णय क्रमांक अविवि-२०१०/प्र.क्र.१५२/१०/का-६, दि. ११ ऑक्टोबर २०१३ तसेच शासन निर्णय दि. २२ डिसेंबर २०२३ च्या तरतुदीनुसार राबविण्यात येत आहे. अर्जाचा नमुना आणि आवश्यक कागदपत्रांची यादी महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर वर उपलब्ध आहे. जिल्ह्यातील इच्छुक मदरसांनी शासन निर्णयात नमूद केलेल्या विहीत नमुन्यातील परिपूर्ण अर्ज आवश्यक कागदपत्रांसह १४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा येथे सादर करावेत. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत, अशी माहिती जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी राहुल पवार यांनी दिली आहे.

अटी व शर्ती : मदरसा चालविणारी संस्था धर्मदाय आयुक्त अथवा वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. (Scheme for Providing Quality Education in Madarsa (SPQEM) या केंद्र पुरस्कृत योजनेचा लाभ घेतलेल्या मदरसांना ही योजना लागू राहणार नाही. शासन निर्णयात नमूद केलेल्या पायाभूत सुविधांसाठीच अनुदान मंजूर करण्यात येईल. यापूर्वी त्या उद्देशासाठी अनुदान मिळाले असल्यास पुनःअनुदान देण्यात येणार नाही. जास्तीत जास्त तीन डी.एड./बी.एड. पात्र शिक्षकांना मानधन देण्यात येईल. शिक्षणासाठी हिंदी, इंग्रजी, मराठी किंवा उर्दू यापैकी एका माध्यमाची निवड करावी लागेल. पायाभूत सुविधा वगळता इतर बाबींसाठी अनुदान मंजूर केले जाणार नाही.




१६. नवी दिल्लीतील भारतीय पोलिस सेवेच्या ७७ व्या आरआर बॅचच्या उद्घाटन समारंभाला संबोधित करताना लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला.

## अमेरिका करणार अणवस्त्रांची चाचणी, रशियाच्या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांचा मोठा निर्णय!

नवी दिल्ली : रशियाने नुकतेच 'पोसायडन' नावाच्या आण्विक-शक्तीवर चालणाऱ्या अंडरवॉटर ड्रोनची चाचणी यशस्वी केल्याचे जाहीर केले होते. या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी सर्वात मोठा निर्णय घेतला आहे. जगातील वाढत्या आण्विक स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर, ट्रम्प यांनी पेंटागॉनला अमेरिकेच्या अण्वस्त्रांची चाचणी तातडीने सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे आंतरराष्ट्रीय शस्त्र नियंत्रण करारांवर याचे मोठे परिणाम होण्याची शक्यता आहे. ट्रम्प सध्या दक्षिण कोरियाच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी 'ट्रुथ सोशल' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून अणवस्त्रांबद्दल मोठी घोषणा केली आहे. त्यांनी पोस्टमध्ये लिहिले आहे की, अमेरिकेकडे इतर कोणत्याही देशापेक्षा जास्त अण्वस्त्रे आहेत.

## पायाभूत सुविधा अनुदान योजनेंतर्गत अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शैक्षणिक संस्थांना अनुदान; १४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शैक्षणिक संस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी ''पायाभूत सुविधा अनुदान योजना'' राबविण्यात येत आहे. योजनेअंतर्गत वार्षिक कमाल १० लाखापर्यंत अनुदान देण्यात येणार असून अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शैक्षणिक संस्थांनी १४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज करावे, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी राहुल पवार यांनी केले आहे.

शासन निर्णय क्रमांक अर्वाधिय-२०१५/प्र.क्र.८०/१५/का-६ दिनांक ७ ऑक्टोबर २०१५ तसेच ७ ऑक्टोबर २०२४ नुसार पायाभुत सुविधासाठी अनुदान देण्यात येणार आहे. ही योजना शासनमान्य खाजगी अनुदानीत, विना अनुदानित, कायम विना अनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच नगरपरिषद क्षेत्रातील शाळांसाठी लागू आहे. संबंधित संस्थांमध्ये किमान ७० टक्के अल्पसंख्याक विद्यार्थी (अपंग शाळांसाठी ५० टक्के) शिकत असल्यास अर्ज पात्र मानला जाईल.

शाळा इमारतींचे नूतनीकरण व डागडुजी, शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, ग्रंथालय व प्रयोगशाळांचे आधुनिकीकरण, संगणक कक्ष उभारणी, प्रसाधनगृह उभारणी, शैक्षणिक फर्निचर खरेदी, वर्गखोल्यांमध्ये पंखे बसविणे, इन्व्हर्टर प्रणाली बसविणे, एलसीडी प्रोजेक्टर व शैक्षणिक सॉफ्टवेअर, इंग्रजी लँग्वेज लॅब, तसेच संगणक हार्डवेअर-सॉफ्टवेअर खरेदी अशा सुविधा निर्माण किंवा अद्ययावत करण्यासाठी संस्थाना अनुदान दिले जाईल.

अल्पसंख्याक बहुल शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, आयटीआय संस्था आणि अपंग शाळांनी शासन निर्णयातील नमूद कागदपत्रांसह परिपूर्ण अर्ज/प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे १४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत सादर करावेत. विलंबाने आलेले किंवा अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. अर्जाचा नमुना आणि आवश्यक कागदपत्रांची संपूर्ण यादी www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. संबंधित संस्था प्रमुखांनी दिलेल्या मुदतीत अर्ज सादर करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## संक्षिप्त...

### लग्नात नववधूने फक्त तीनच सोन्याचे दागिने परिधान करावे, पंचायतीचे निर्देश

**दैनिक आपला विदर्भ**

**देहरादून:** दिवसेंदिवस सोन्याच्या आणि चांदीच्या किमती या गगनाला भिडत आहेत. भारतीय परंपरेनुसार आपण बहुतेक सणांमध्ये, लग्नात दागिने घालतोच पण हल्ली दागिने खरेदी सर्व सामान्य लोकांच्या आवाक्याबाहेर गेली आहे. हिच एकूण परिस्थिती लक्षात घेऊन भारतातील एका गावाने एक महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यामुळे दागिन्यांवर खर्च कमी होईल.

उत्तराखंड मधील अनुसूचित जनजाती क्षेत्र जौनसार भागातील एका पंचायतीनं सोडलेला हे फर्मान महिलांनी किती सोन्याचे दागिने घालावेत याबाबत आहे. या पंचायतीनं लग्न किंवा इतर समारंभात तीन पेक्षा जास्त सोन्याचे दागिने घालण्यावर बंदी घातली आहे.

महिलांनी सोन्याचे दागिने घालण्याबाबतचा हा नियम कंजाड आणि इंद्रोली गावात लागू करण्यात आला आहे. महिलांना कानातील झुमके, नाकातील नथ आणि मंगळसूत्र हे तिचे सोन्याचे दागिने घालण्याची सवलत देण्यात आली आहे. दोन गावांच्या संयुक्त पंचायतीनं या नियमांचं उल्लंघन करण्याऱ्या संबंधित व्यक्तीला ५० हजार रुपयाचा दंड ठोठावला आहे. दरम्यान कंदाड येथील रहिवासी असलेल्या अर्जुन सिंह यांनी सोन्याच्या वाढत्या किमतीमुळे हा निर्णय घेतल्याचं सांगितलं.

लग्न आलं की महिला सोन्याच्या दागिन्यांचा आग्रह धरतात. पण सोन्याचे दार गगनाला भिडले आहेत. त्यामुळे कुटुंबात वाद होऊ नये यासाठी पंचायतीने विचारपूर्वक दागिन्यांवर बंधन आणणारा निर्णय घेतला आहे. पंचायत लग्नातील इतर खर्च आणि मद्य अर्थात दारूवर होणारा खर्च यावर नियंत्रण आणण्याबाबतही विचार करत आहे. अनेक महिलांनी पंचायतीच्या निर्णयाचे स्वागत केले आहे.

### ५२ वर्षांच्या महिमा चौधरीनं, ६२ वर्षांच्या संजय मिश्रांसोबत बांधली लग्नगाठ?

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडची स्टार अभिनेत्री महिमा चौधरी सध्या गूगलवर ट्रेंड करतेय. अचानक महिमा चौधरी ट्रेंडमध्ये का आलीय? असा प्रश्न सर्वांनाच पडलाय. पण, तिचं ट्रेंडमध्ये येण्याचं कारण ऐकून सर्वांना आश्चर्याचा धक्का बसलाय. सध्या सोशल मीडियावर एक व्हिडीओ व्हायरल होतोय. त्या व्हिडीओमध्ये ५२ वर्षांच्या महिमा चौधरीनं दुसरं लग्न केलंय. कारण ती ब्रायडल लूकमध्ये अभिनेता संयज मिश्रांसोबत पोज देत असल्याचं पाहायला मिळतंय. सर्व पॅपाराझी त्या दोघांना शुभेच्छा देतायत आणि त्यानंतर महिमा चौधरी पॅपाराझींना मिठाई खाऊन जा, असंही सांगतेय. सोशल मीडियावर हा व्हिडीओ पाहून चाहते पुरते चक्रावून गेले आहेत. थांबा... गोंधळून जाऊ नका... कारण महिमा चौधरी, संजय मिश्रा यांनी दुसरं लग्न केलेलं नाही. तर, दोघेही आगामी सिनेमा 'दुर्लभ प्रसाद की दूसरी शादी'चं प्रमोशन करत आहेत. त्यासाठी महिमा चौधरी नववधूच्या रुपात आलेली. तर, संजय मिश्रा वराच्या रुपात दिसले. या फिल्मच्या प्रमोशनचं फोटोशूट सुरू होतो. तेव्हाच पॅपाराझींसमोर संजय मिश्रा आणि महिमा चौधरी एकत्र पोझ देताना दिसले. हा व्हिडीओ पाहिल्यानंतर चाहत्यांच्या वेगवेगळ्या प्रतिक्रिया पाहायला मिळत आहेत.

दरम्यान, अभिनेत्री महिमा चौधरीनं गेल्या काही दिवसांत आपला आगामी सिनेमा दुर्लभ प्रसादचं दुसरं लग्नचं मोशन पोस्टर शेअर केलेलं. ज्यामध्ये संजय मिश्रा, महिमा चौधरी सिनेमातल्या लूकमध्ये दिसून आले. पोस्टरमध्ये एका पन्नास वर्षांच्या व्यक्तीच्या दुसऱ्या लग्नाचं पॅम्प्लेट छापलेलं दिसतंय. यासोबतच अभिनेत्रीनं कॅप्शनमध्ये लिहिलंय की, 'नवरी मिळालीय, आता तयार व्हा... कारण लवकरच वरात निघणार आहे...' या फिल्ममध्ये संजय मिश्रा, महिमा चौधरीसोबतच व्योम आणि पलक ललवानी दिसत आहेत.

### कौडियाला नदीत उलटली बोट : २८ नागरिक बुडाले, १३ जणांना बचावण्यात यश, शोधमोहीम सुरू

**लखनऊ :** नदीत बोट उलटून तब्बल २८ नागरिक बुडाल्यानं मोठी खळबळ उडाली. या आपघातील १३ नागरिकांना बचावण्यात प्रशासनाला यश आलं आहे. मात्र १५ नागरिकांचा अद्यापही शोध सुरू आहे. ही घटना उत्तर प्रदेशातील बहराईच इथल्या कौडियाला नदीत भरतपूर गावाजवळ ही घटना घडली. बुधवारी रात्री उशीरा एका महिलेचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच एसडीआरएफ, एनडीआरएफ आणि जिल्हा प्रशासनाची पथकं घटनास्थळी दाखल झाली. पथकातील जवानांच्या मदतीनं नदीत शोध मोहीम सुरू आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही घटनेची दखल घेतली आहे.

नदीत बोट उलटून २८ नागरिक बुडाले : सुजौली परिसरातील कतरनियाघाट पर्वतरांगातील भरतपूर गावाजवळ ही घटना घडल्यानं मोठी खळबळ उडाली आहे. भरतपूर गाव नदीच्या पलीकडं आहे. इथले नागरिक बहुतेकदा इतर गावांमध्ये बोटीनं प्रवास करतात. यात शेजारच्या लखीमपूर खेरी जिल्ह्यातील खैराटिया गावाचा समावेश आहे. बुधवारी संध्याकाळी ६ वाजताच्या दरम्यान अनेक नागरिक बोटीतून भरतपूरला परत येत होते. कौडियाला नदीच्या मध्यभागी बोट आल्यानंतर उलटली. त्यामुळे नागरिकांची मोठी तारांबळ उडाली. या अपघातात आतापर्यंत १३ नागरिकांना वाचवण्यात आलं आहे.

## बंजारा समाजाचा आरक्षणासाठी संताप; समृद्धी महामार्गावर ठिय्या आंदोलन, दोन तास वाहतूक ठप्प!









**दैनिक आपला विदर्भ**

**मालेगाव/प्रतिनिधी :** अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करून एसटी आरक्षण द्यावे, या प्रमुख मागणीसाठी बंजारा समाजाचा आज राज्यव्यापी आक्रोश उफाळला. अकोलाहैदराबाद राष्ट्रीय महामार्गासह हिंदू हृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर समाज बांधवांनी ठिय्या आंदोलन करत रस्ता रोको केला. या आंदोलनामुळे तब्बल दोन तास वाहतूक ठप्प झाली होती.

राज्यात हैदराबाद गॅझेट लागू करून बंजारा समाजाला त्यांचा हक्काचा आरक्षण दर्जा मिळावा, या मागणीसाठी गेल्या महिनाभरात तब्बल ५६ मोर्चे काढण्यात आले. मात्र शासनाने अद्यापही दखल न घेतल्याने आज समाजाच्या संयमाचा बांध फुटला. प्रथम समृद्धी महामार्गावर सुमारे अर्ध्या तासासाठी आंदोलन झाले, तर नंतर अकोलाहैदराबाद महामार्गावर दिड तासांचा रस्ता रोको करण्यात आला. पोलिसांनी मध्यस्थी करून वाहतूक सुरळीत केली.

या आंदोलनात पोहरादेवीचे महंत कबीरदास महाराज, संजय महाराज, कांतीलाल नाईक (बंजारा क्रांती दल), नाना बंजारा (तांडा सुधार समिती), राजू रत्ने, प्रा. अनिल राठोड, डॉ. विजय जाधव, डॉ. सचिन पवार, श्रावण जाधव, सेवाराम आडे आदी मान्यवरांसह अकोला, वाशिम, बुलडाणा, यवतमाळ, अमरावती, हिंगोली जिल्ह्यातील शेकडो समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले.

आंदोलनादरम्यान कोणताही अप्रिय प्रकार घडू नये यासाठी जवळपास ८०० पोलिसांचा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. प्रशासनाच्या हस्तक्षेपानंतर महामार्गावरील वाहतूक पुन्हा सुरळीत झाली.

''राज्य सरकारने तात्काळ बंजारा समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करून न्याय द्यावा, अन्यथा लढा आणखी तीव्र करण्यात येईल,'' असा इशारा समाज नेत्यांनी दिला.

## विविध वृत्त...

### जिल्हा रुग्णालयातील ५ नोव्हेंबरचे दिव्यांग तपासणी शिबिर रद्द

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : येथील जिल्हा रुग्णालयात नियमितपणे प्रत्येक बुधवारी अस्थिव्यंग संबंधित दिव्यांग तपासणी बोर्ड कार्यरत असतो. मात्र येत्या बुधवार दि. ५ नोव्हेंबर रोजी गुरुनानक जयंतीनिमित्त सार्वजनिक सुटी असल्यामुळे त्या दिवशी होणारे अस्थिव्यंग संबंधित दिव्यांग तपासणी शिबिर रद्द करण्यात आले आहे.

सदर दिवशी नागरिकांनी जिल्हा रुग्णालय, बुलडाणा येथे दिव्यांग तपासणीस येऊ नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. तसेच नागरिक जर त्या दिवशी तपासणीस आले, तर झालेल्या गैरसोयीस प्रशासन जबाबदार राहणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

### पुणेकर, रस्त्यावर खड्डा दिसला की गप्प राहायचं नाही! 'रोड मित्र'ला सांगा, २४ तासांत खड्डा गायब

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** : रस्त्यावरील खड्ड्यांबाबत वारंवार तक्रारी होत असताना, महापालिकेने सुरू केलेल्या पीएमसी रोड मित्र या मोबाईल ॲपने नागरिकांचे काम सोपे केले आहे. या ॲपच्या माध्यमातून नागरिकांना आता रस्त्यावर दिसणाऱ्या खड्ड्यांची माहिती काही सेकंदांत प्रशासनापर्यंत पोहोचवता येते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्या तक्रारीवर त्वरित कार्यवाही होत आहे. याचाच प्रत्यय वारजे परिसरात नुकताच आला असून, एका नागरिकाने केलेल्या तक्रारीनंतर अवघ्या २४ तासांत रस्त्यावरील खड्ड्यांची दुरुस्ती पूर्ण करण्यात आली आहे.

वारजेतील कॉलनीजवळील रोडवर पोलिस ठाण्याच्या कॉर्नरवर पावसामुळे मोठा खड्डा पडला होता. यामुळे वाहनचालक आणि पादचारी त्रस्त झाले होते. स्थानिक रहिवाश्याने शनिवारी सकाळी रोड मित्र ॲपवर या खड्ड्याची तक्रार आणि तीन फोटो अपलोड केली. ॲपमध्ये लोकेशन स्वयंचलितपणे जोडले गेल्याने तक्रार थेट पुणे महापालिकेच्या वारजे विभागातील अभियंत्यांपर्यंत पोहोचली.

तक्रार मिळताच वारजे कर्वेनगर क्षेत्रीय विभागातील कार्यालयातील कनिष्ठ अभियंता पियुष बोंडे यांनी संबंधित एसएमएसद्वारे तक्रारकर्त्याशी संपर्क साधला आणि परिस्थितीची माहिती दिली. त्यानंतर लगेचच विभागीय कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन रस्त्यावर डांबर टाकून खड्डा बुजवण्याचे काम सुरू केले. दिवसअखेरीस रस्त्याची दुरुस्ती पूर्ण झाल्याने नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला.

महापालिकेच्या नियमांनुसार तक्रार मिळाल्यानंतर तीन दिवसांच्या आत कारवाई करणे आवश्यक असते. परंतु या प्रकरणात अवघ्या २४ तासांतच काम पूर्ण झाल्याने महापालिकेच्या तत्परतेचे कौतुक होत आहे. रोड मित्र ॲप हे खऱ्या अर्थाने नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे.

### चिमुकल्याचे जोशपूर्ण भाषण, म्हणाला "फडणवीस पहिली गोळी माझ्यावर"

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** : आंदोलन गुंडाळण्यात माहिर असलेल्या फडणवीस सरकारने इंग्रजी वर्तमान पत्र आणि न्यायालयाच्या आडून नागपूरचे शेतकरी आंदोलनही गुंडाळण्याचे प्रयत्न केला. त्याचा प्रचंड संताप लाखोंच्या संख्येने कर्जमाफीच्या मागणीसाठी आलेल्या शेतकऱ्यांच्या मनात आहे. ही खदखद रस्त्यावर बसलेल्या वृद्ध शेतकऱ्यांसोबतच आंदोलनात सहभागी झालेल्या शेतकरी पुत्र युवक व गावात राहणाऱ्या मुलांच्या मनातही आहे.बुधवार रात्री जेव्हा पोलीस न्यायालयाचा आदेश घेऊन आंदोलनस्थळी आले तेव्हा आंदोलक कमालीचे संतप्त झाले होते. रात्री झालेल्या सभेत एका अल्पवयीन मुलाने शेतकऱ्यांसोबत बोलताना जोशपूर्ण भाषण केले. फडणवीस साहेब कोणतीही सूचना न देता एक पत्र पाठवून आम्हाला जेल मध्ये पाठवण्याची भीती दाखवता, पहिली गोळी माझ्या छातीवर चालवा नंतर बच्चूभाऊवर चालवा असे हा चिमुकला म्हणाला. त्याच्या या जोशपूर्ण भाषणाने उपस्तित शेतकऱ्यांचा उत्साह अधिक वाढला.

रस्ता मोकळा करा, अन्यथा तुरुंगात जा असे पत्र घेऊन बुधवारी जेव्हा पोलीस आले तेंव्हा आंदोलक कमालीचे आक्रमक झाले होते. रात्री दोन राज्यमंत्र्यांशी चर्चा झाल्यावर बच्चू कडू यांनी मुंबईत सरकारसोबत बैठकीत सहभागी होण्याची तयारी दर्शवली व महामार्ग मोकळा केला. त्यानंतर रस्त्यालगत शेतकरी बसले, तेथे अनेक शेतकऱ्यांची भाषणे झाली, त्यातच एक चिमकुलाही बोलला, तो नुसताच बोलला नाही तर एखाद्या फर्ड्या वक्तव्याला लाजवेल असे भाषण त्याने केले. तो म्हणाला ''पोलीस एक पत्र घेऊन आले, म्हणाले रस्ता खाली करा अन्यथा कारागृहात जा, मी म्हणतो फडणवीस साहेब पोलीस असो किंवा सरकारचे अधिकारी ते जे अन्न खातात ते शेतकरी पिकवतात, तुम्ही त्यांनाच कारागृहात पाठवता, त्यांना अटक करायची अ सेल, त्यांच्यावर गोळ्या झाडायच्या असेल तर पहिले तुम्हाला मला अटक करावी लागले ,माझ्यावर गोळ्या झाडाव्या लागेल.

# बुलढाण्याचा अभिमान वैभव भुतेकर!

## शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रवक्ता ॲड. जयश्री शेळके यांच्याकडून वैभव भुतेकर यांचा गौरवपूर्ण सत्कार

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा परीक्षा २०२४ मध्ये राज्यात दुसरा क्रमांक मिळवून बुलढाणा जिल्ह्याचे नाव उजळवणारे वैभव बबनराव भुतेकर (रा. पाडळी, ता. बुलढाणा) यांचा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या प्रवक्ता ॲड. जयश्री शेळके यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन मनः पूर्वक सत्कार केला.

या प्रसंगी वैभव यांची आई, नातेवाईक तसेच मित्रपरिवार उपस्थित होता. घरगुती आणि भावनिक वातावरणात झालेल्या या भेटीने सर्वांच्या मनात अभिमान आणि प्रेरणेची नवी ज्योत प्रज्वलित झाली.



वैभव भुतेकर यांनी ग्रामीण भागातील मर्यादित साधनांमध्ये राहून स्वबळावर राज्यसेवा परीक्षा उत्तीर्ण केली. त्यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, आईचे आशीर्वाद आणि दिवंगत वडिलांचे संस्कार हेच बळ ठरले. कुटुंबाच्या परिस्थितीशी झुंज देत त्यांनी हे यश संपादन केले असून, हे यश प्रत्येक ग्रामीण युवकासाठी प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे. या प्रसंगी बोलताना ॲड. जयश्री शेळके म्हणाल्या, "वैभवसारखे विद्यार्थी महाराष्ट्राचे भविष्य घडवतात. त्यांनी परिश्रम, शिस्त आणि आत्मविश्वासाच्या जोरावर सिद्ध केले की यश मिळवण्यासाठी साधनांची नव्हे, तर चिकाटीची गरज असते. दिवंगत वडिलांच्या आशीर्वादाने आणि आईच्या प्रेरणेने वैभवने हे साध्य केले. तो संपूर्ण बुलढाण्याचा अभिमान आहे.''

सत्कारावेळी वैभव यांच्या आईंच्या चेहऱ्यावरून समाधान, अभिमान आणि हळव्या आठवणी झळकत होत्या. त्यांनी सांगितले, "वैभवने आपल्या वडिलांचे स्वप्न पूर्ण केले आहे. हे यश आमच्या कुटुंबासाठी भावनिक क्षण आहे.''

वैभव भुतेकर यांचे यश हे सिद्ध करते की "जिथे इच्छा, तिथे मार्ग!'' परिश्रम, संघर्ष आणि संस्कार यांच्या बळावर कोणतेही स्वप्न साकार करता येते. बुलढाणा जिल्ह्यातील युवकांसाठी हे यश प्रेरणादायी दीपस्तंभ ठरले असून, त्यांच्या कुटुंबाचा आणि संपूर्ण जिल्ह्याचा अभिमान वाढवणारे आहे. यावेळी गोविंद पवार, सर्जेराव भुतेकर , गजानन पवार, रवी पवार, भागवत कड सर, गणेश कड सर, पंढरी पवार, भूषण पवार, प्रमोद पवार, बाळूभाऊ भराड, विश्वनाथ भराड, सुधीर पवार इ. उपस्थित होते.

### वायंगणी कांबळीवाडी समुद्रकिनारी कुजलेल्या अवस्थेत आढळला भला मोठा व्हेल मासा...

वेंगुर्ले : वेंगुर्ले तालुक्यातील वायंगणी कांबळीवाडी समुद्रकिनारी आज सकाळी भला मोठा व्हेल मासा कुजलेल्या अवस्थेत किनाऱ्याला लागला आहे. सुमारे ३० ते ४० फूट लांबीचा हा मासा असून त्याचा बराच भाग कुजून गेला आहे. सध्या सुरू असलेल्या वादळामुळे हा मासा वाहत किनाऱ्यावर आल्याची प्राथमिक माहिती आहे. समुद्रामध्ये काही दिवसांपूर्वी मेलेला हा व्हेल मासा समुद्राच्या लाटांबरोबर पुढे पुढे सरकत आज सकाळी वायंगणी कांबळेवाडी येथील समुद्र किनाऱ्याला लागला आहे. याबाबत कासव मित्र सुहास तोरस्कर यांनी माहिती दिली. त्यांनी या माशाबाबत कांदळवन विभाग व वनविभाग यांना कळिवले आहे.

### जनतेचा विश्वास, विकासाचा ध्यास प्रा. सतीश ताजने नगरसेवकपदासाठी मैदानात

मेहकरच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासू आणि प्रामाणिक नेतृत्व सज्ज

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर तालुक्यातील शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात ठसा उमटवणारे व्यक्तिमत्व म्हणून ओळख असलेले प्रा. सतीश गोपाळराव ताजने (M.A., B.Ed.) यांनी मेहकर नगरपरिषद निवडणुकीच्या रिंगणात नगरसेवक पदासाठी उतरण्याची घोषणा केली आहे. त्यांच्या या निर्णयाने स्थानिक राजकारणात चैतन्य निर्माण झाले आहे.




श्री आयाजी परसाजी पाटील विद्यालय, मोळा येथील मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असताना प्रा. ताजने यांनी शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावली. पुढे माजी उपसभापती, पंचायत समिती मेहकर या पदावर कार्य करताना त्यांनी प्रशासनिक आणि विकासात्मक निर्णयक्षमता दाखवून दिली. त्यांच्या काळातच मेहकर पंचायत समितीला तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते 'राष्ट्रपती पुरस्कार' प्राप्त झाला हा त्यांच्या कार्यक्षमतेचा ठसा मानला जातो.

सर्व जाती-धर्मांतील लोकांमध्ये त्यांचा उत्तम संपर्क आणि विश्वास आहे. बुलढाणा जिल्ह्यातून सर्वाधिक मताधिक्याने निवडून आलेले उपसभापती म्हणून त्यांचे नाव आजही गाजते. किशोरभाऊ गारोळे यांच्या टीममधील सदस्य म्हणून त्यांनी प्रामाणिकपणे समाजकारणाचा आदर्श घालून दिला.

प्रा. ताजने म्हणाले, "एका प्रामाणिक आणि मेहनती नगरसेवकाने आपल्या प्रभागाचा विकास करून दाखवू शकतो, हे कृतीतून सिद्ध करायचे आहे,'' अशी त्यांची ठाम भूमिका आहे.

त्यांच्या उमेदवारीमुळे मेहकरवासीयांमध्ये उत्सुकता वाढली असून, अनुभवी व अभ्यासू नेतृत्व नगरपरिषदेत आल्यास शासनाच्या योजना, विकासनिधी आणि प्रशासनिक लाभ मेहकरच्या दारी पोहोचतील, असा जनतेत विश्वास व्यक्त होत आहे.

### मेहकरमध्ये परिवर्तनाची नवी चाहूल पत्रकार दांपत्य निलेश (मुन्ना) काळे व सौ. चंद्रभागा काळे रिंगणात





दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** :मेहकर शहरातील प्रभाग क्रमांक १ आणि २ मध्ये सध्या चर्चे चा केंद्रबिंदू ठरले आहेत पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते निलेश उर्फ (मुन्ना) काळे आणि त्यांची धर्मपत्नी सौ. चंद्रभागा निलेश काळे.

गेल्या अनेक वर्षांपासून पत्रकारिता, समाजकारण आणि लोकचळवळ या क्षेत्रात कार्यरत राहून निलेश काळे यांनी आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. गोरगरीब, वंचित आणि अन्यायग्रस्तांसाठी त्यांनी नेहमीच आवाज उठवला. पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी लोकशाहीचा चौथा स्तंभ अधिक बळकट करत, अनेकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

आता समाजसेवेचा हा अनुभव थेट जनतेच्या सेवेत उतरवण्यासाठी, प्रभाग क्रमांक १ आणि २ मधून निलेश (मुन्ना) काळे व सौ. चंद्रभागा काळे यांनी मेहकर नगर परिषद निवडणुकीत उमेदवारी जाहीर केली आहे. या निर्णयानंतर प्रभागात त्यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरु आहे

लोकांच्या आग्रहास्तव सौ. चंद्रभागा काळे यांच्या प्रचाराला सुरुवात झाली असून नागरिकांनी त्यांना प्रचंड समर्थन दर्शविलेल्या चे बोलल्या जात आहे. अद्याप कोणत्या पक्षाकडून उमेदवारी मिळणार याबाबत निर्णय झालेला नसला तरी निलेश काळे यांनी स्पष्ट केले की, "जर तिकीट मिळाले नाही तरी आम्ही जनतेच्या आशीर्वादावर अपक्ष म्हणून मैदानात उतरण्यास तयार आहोत.''

या पत्रकार दांपत्याच्या उमेदवारीमुळे प्रभाग क्रमांक १ आणि २ मध्ये नव्या आशेचे आणि परिवर्तनाच्या वातावरणाचे वारे वाहू लागले आहेत. नागरिकांमध्ये या विषयावर मोठी चर्चा रंगत आहेत.

"सत्य, सेवा आणि समाजकारण हाच आमचा मार्ग!'' असे सांगत निलेश (मुन्ना) काळे यांनी मेहकर प्रभाग १ व २ मध्ये नव्या बदलाचा शंखनाद केला आहे.

## जनता आणि प्रशासनामध्ये सेतू म्हणून काम करणार : आमदार सिद्धार्थ खरात

### जनतेच्या आवाजाला मिळाले आमदारांचे उत्तर "लोकशाहीचा खरा उत्सव''








दैनिक आपला विदर्भ

**लोणार/प्रतिनिधी** : लोणार तालुक्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या अध्यक्षतेखाली आज भव्य जनता दरबार पार पडला. नागरिकांच्या समस्या थेट आमदारांसमोर मांडण्यासाठी लोकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दरबार गजबजवला जनता आणि प्रशासनामध्ये सेतू म्हणून काम करणार असल्याची ग्वाही आमदार सिद्धार्थ खरात यांनी दिली.

रस्ता, घरकुल, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, वीज, तसेच शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतील विलंब या विषयांवर नागरिकांनी खुलेपणाने मते मांडली. प्रशासनातील निष्क्रीयतेबद्दलही अनेकांनी थेट आवाज उठविला.

जनता दरबारात उपस्थित अधिकारी नागरिकांच्या प्रत्येक तक्रारीकडे लक्षपूर्वक ऐकून घेत होते. आमदार सिद्धार्थ खरात यांनी सर्व मुद्द्यांची गंभीर दखल घेत सखोल चौकशी करून त्वरित कार्यवाहीचे आश्वासन दिले.

"आजचा जनता दरबार हा फक्त ऐकण्यासाठी नव्हे, तर उत्तरदायित्वाची नवी दिशा ठरविण्यासाठी आहे. प्रत्येक प्रश्न हा शासनाच्या तिजोरीतून उत्तर मागतो आणि आम्ही ते उत्तर मिळविण्यास कटिबद्ध आहोत,''असे यावेळी आ. सिद्धार्थ खरात बोलले.

**अधिकाऱ्यांची उपस्थिती**

दरबारास उपविभागीय अधिकारी (महसूल) रवींद्र जोगी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अधिकारी प्रदीप लोलुरे, तहसीलदार डॉ. भूषण पाटील, गटविकास अधिकारी उमेश देशमुख, मुख्याधिकारी रामराजे कापरे, दुय्यम निबंधक कैलास गाढे, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे उपविभागीय अधिकारी श्याम मोरे, उपअभियंता चंद्रकांत खडसे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गाडेकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. वैभव मापारी, लोणार डेपो मॅनेजर राजेंद्र सानप यांसह संबंधित शासकीय विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पक्ष व स्थानिक प्रतिनिधींची हजेरी**

जनता दरबारात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हा प्रमुख प्रा. आशिष रहाटे, जिल्हा संघटक डॉ. गोपाल बच्छीरे, तालुका समन्वयक तेजराव घायाळ पाटील, तालुका अध्यक्ष राजेंद्र बुधवत, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुका अध्यक्ष सदानंद पाटील, महिला आघाडी तालुका प्रमुख तारामती जायभाये, युवा तालुका अध्यक्ष जिवन घायाळ पाटील, तसेच दाभा सर्कल प्रमुख विजय मोरे, गजानन मोरे, गजानन जाधव, श्रीकांत नागरे, प्रविण सरदार, बंडू जोगदंड, स्वप्निल हाडे, संजीवनी वाघ, भगवानराव चेके, समाधान साळवे, सुदन अंभोरे, परमेश्वर दहातोंडे, राजू दहातोंडे यांच्यासह शिवसैनिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**१५ नोव्हेंबरला आढावा बैठक**

दरबारात मांडलेल्या मुद्द्यांवर १५ नोव्हेंबर रोजी विशेष आढावा बैठक घेण्यात येणार असल्याची घोषणा आमदारांनी केली.